FORM-1 A N.C.R.B. I.I.F.I

ड

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 8, वर्ष Year २०१८, दिनांक Date २०/०९/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act (सुधारीत अधि. २०१८), कलमे Sections
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शनिवार, तारीख पासून Date from १६/९/२०१८ वेळ Time १८:३०, तारीख पर्यंत Date to १८/९/२०१८ वेळ Time १४:५३ वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date ......, वेळ Time ......
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ९/२०१८, तारीख Date २०/९/२०१८, वेळ Time ८:१० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : ......, लेखी / तोंडी Written / Oral तोंडी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ......, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ......
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name अधिक्षक अभियंता कार्यालय, पायाभूत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पीटल, मुंबई ४००००१, ठिकाणाचा नंबर No. if any ......, गल्ली Ward ......, रस्त्याचे नाव Name of road पी. डी. मेलो
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name दिपक चौभारेपाटील (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name रमेशराव
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 7719934222
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation कंत्राटदार
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste कुनबी, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता : Address : ......, गल्ली / सर्वे नं. Ward ......, घर / नाव नंबर House/Name No. ......, फोन /मो. नंबर Phone/M. No. ......, पॅन नं. Pan No. ......, वोटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road मुक्ताई नगर, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place एस.टी. बस स्टँड जवळ, गाव Village मलकापूर, पोस्ट Post मलकापूर, पो. स्टे. P. Stn. मलकापूर
   तालुका Taluka मलकापूर, जिल्हा Distt. बुलढाणा, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   आरोपी नामे राजेंद्र शंकर सोनवणे, वय-५८ वर्षे, हुद्दा- कार्यकारी अभियंता
   रा.ठी. आराध्य बंगलो, प्लॉट नं २३९, सर्वे क्र. १८८/१, निसर्ग नगर,
   कालानगर जवळ, दिंडोरी रोड, मेरी, नाशिक, राज्य - महाराष्ट्र

यातील फिर्यादी नामे श्री दिपक रमेशराव चोभारेपाटील वय - 30 वर्षे, धंदा - शासकीय कंत्राटदार रा. श्री. मु. पो. एस.टी. बस स्टँडच्या पाठीमागे, सुवर्णाई नगर, मलकापूर, ता - मलकापूर, जिल्हा - बुलढाणा, यांच्या दि. १८/१/२०१८ रोजीच्या मराठीत टंकलेखित केलेल्या फिर्यादी जबाब हीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात आली असून सोबत जोडण्यात आली आहे.

समक्ष

Pramod

प्रमोद परदेशी
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

सही

## फिर्याद

दिनांक. १९/०१/२०१९

श्री. दिपक रमेशराव चांभारेपाटील, वय ३० वर्षे, व्यवसाय– शासकीय कंत्राटदार, रा.ठी. मु.पो. एस.टी. बस स्टॅण्डच्या पाठीमागे, मुक्ताई नगर, मलकापूर, ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा, मो नं. ७७१९९३४२२२

..............................................................................................................

मी वरीलप्रमाणे असुन, वर नमुद ठिकाणी माझे जन्मापासून कुटुंबियासह वास्तव्यास आहे. मी बी.ई. सिव्हील, एम.बी.ए.पर्यंत शिक्षण घेतलेले असुन, मी सन २०१२ पासुन शासकीय कंत्राट घेतो. शासकीय कंत्राटदार म्हणुन माझेकडे कायदेशीर परवाना आहे. मी बुलढाणा जिल्हयात शासकीय कंत्राट घेवून काम करीत असुन त्याकरीता लागणाऱ्या निविदा हया वेळीवेळी ई–निविदा मार्फत ऑनलाईन भरत असतो.

सन २०१८ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, नरवेल, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा येथे नविन मुख्य इमारतीचे बांधकाम करणे या कामाकरीता ई–निविदा निघाल्याने मी mahtenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पध्दतीने ई–निविदा भरली होती. माझी निविदा बहाल रक्कम रु. १,४०,०१,२२०.५९/– एवढी असुन ती मंजूर झाल्याबाबत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान पायाभूत सुविधा विकास कक्ष, नाशिक मंडळ, नाशिक यांचेकडून प.क्र.उपसंआसे/एनएचएम/काअ/पासूविक/९७६–९७८/१८, दिनांक. २१/१२/२०१८ अन्वये पत्र प्राप्त होवुन पत्रात नमुद केल्याप्रमाणे कामाच्या सुरक्षित अनामत रक्कम रुपये १,५०,३६५/– (१%) "INFRA DEV WING NATNL HEALTH MISSION MAHA" या नावाने सात दिवसाच्या आत राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष भरण्याबाबत कळविले होते. त्यानुसार मी दिनांक.२५/१२/२०१८ रोजी स्टेट बॅक ऑफ इंडिया या बॅकेचा डि.डी क्रमांक.२६०४६२ कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान पायाभुत सुविधा विकास कक्ष, नाशिक मंडळ, नाशिक या कार्यालयात जमा केला होता.

त्यानंतर मला कार्यारंभ आदेश प्राप्त करणेकरीता उपअभियंता श्री.एस के.मोरे यांनी मोबाईल क्र. ९९७०९३३५५६ या वरुन कॉल करुन त्यांच्या बुलढाणा येथील कार्यालयात बोलावून, त्यांनी कामाच्या १% रक्कम म्हणेजच रु. १,५०,०००/– अधिक्षक अभियंता यांना दयावे लागतील व तसेच कार्यकारी अभियंता श्री. राजेंद्र शंकर सोनवणे यांच्याशी संपर्क करण्यास उपअभियंता श्री.एस के.मोरे यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे मी माझे वर नमुद मोबाईल क्रमांकावरुन कार्यकारी अभिंयता श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांना त्यांच्या मोबाईल क्र. ९४०३६९६९०० संपर्क केला असता, त्यांनी देखील उपअभियंता श्री.एस के.मोरे यांनी सांगितल्याप्रमाणे करावे लागेल, तरच कार्यारंभ आदेश होईल असे सांगितले, लवकर न केल्यास आचारसंहिता लागल्यानंतर कार्यारंभ आदेश मिळणार नाही असेही मला सांगितले होते.

त्यांनतर मी माझे वर नमुद मोबाईल क्रमांकावरुन कार्यकारी अभियंता श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांना त्यांचा मोबाईल क्र.९४०३६९६९०० वर संपर्क केला असता, त्यांनी मला दिनांक. ११/०१/२०१९ रोजी अधिक्षक अभियंता कार्यालय, पायाभुत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, पी.डिमेलो रोड, मुंबई येथे येवुन भेटण्यास सांगितले होते. त्यानुसार मी दिनांक. ११/०१/२०१९ रोजी सुमारे १६:०० वा अधिक्षक अभियंता श्री.विलास कांबळे यांच्या पायाभुत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, पी.डिमेलो रोड, मुंबई येथील कार्यालयातील कक्षात येवुन भेटलो असता, त्यावेळेस त्यांच्या कक्षात कार्यकारी अभियंता श्री.राजेंद्र शंकर सोनवणे हे सुध्दा होते. त्यावेळेस कार्यकारी अभियंता श्री.राजेंद्र सोनवणे यांनी अधिक्षक अभियंता श्री.विलास कांबळे यांना माझे कार्यारंभ आदेशाबाबत सांगितले की, " उपअभियंता श्री.एस के.मोरे यांना क्लिअर मेसेज यांना दिलेला आहे." मी म्हणालो की, "बिलो आहे थोडे जास्त होतय." यावर अधिक्षक अभियंता श्री.विलास कांबळे म्हणाले की, " बोलतो मी."

दिनांक. १६/०१/२०१९ रोजी कार्यकारी अभियंता श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांना मी माझे वर नमुद मोबाईलवरुन त्यांच्या मोबाईल क्र.९४०३६९६९०० संपर्क साधला असता, माझे कामाचे काय झाले याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला दि. १८/०१/२०१९ व दि. १९/०१/२०१९ रोजी मी अधिक्षक कार्यालय, पायाभुत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, पी.डिमेलो रोड, मुंबई येथे आहे. त्यावेळी मला सदर कार्यालयात येवुन भेटण्यास सांगितले होते.

मला लोकसेवक श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक. १८/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार केली होती. त्यानुसार पो.नि.परदेशी यांचे सुचनेवरुन मी सरकारी पंचासह लोकसेवक श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांची अधिक्षक कार्यालय, पायाभुत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, मुंबई येथे भेट घेतली असता, श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांनी मला वर्कऑर्डर देण्याकरीता निविदा रक्कमेच्या १% रक्कम म्हणजेच सुमारे रु. १,५०,०००/– रुपये लाचेची मागणी केली असता, एवढी रक्कम मला शक्य नाही असे सांगितले. त्यावर लोकसेवक राजेंद्र सोनवणे यांनी किती देतो असे म्हटल्यावर मी एक लाख असे बोललो. त्यावर लोकसेवक राजेंद्र सोनवणे यांनी अधिक्षक अभियंता यांना विचारुन सांगतो, असे सांगितले. लोकसेवक राजेंद्र सोनवणे यांनी मला आज दिनांक. १९/०१/२०१९ रोजी फोन करुन रु. १,००,०००/– लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले. मी पंच व पोलीस पथकासह अधिक्षक कार्यालय, पायाभुत सुविधा विकास कक्ष, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, मुंबई या कार्यालयात येवुन लोकसेवक श्री.राजेंद्र सोनवणे यांची भेट घेतली असता, त्यांनी मागणी केल्यानुसार माझेकडून लाचेची रक्कम स्विकारली आहे म्हणुन माझी लोकसेवक श्री.राजेंद्र शंकर सोनवणे यांचे विरोधात तक्रार असुन, त्यांचेवर कायदेशीर कारवाई होण्याची विंनती आहे. लोकसेवक राजेंद्र सोनवणे यांचेशी माझे कोणतेही पुर्व वैमनस्य नाही तसेच आमचेत कोणताही देण्या–घेण्याचा व्यवहार नाही.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित केला असुन, तो मी वाचला आहे तो माझे सांगण्यानुसार बरोबर व खरा आहे.

समक्ष

( प्रमोद परदेशी )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ——
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
——

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ——
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ——
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक राजेंद्र शंकर सोनवणे, कार्यकारी अभियंता यांनी फिर्यादी यांचेकडून प्राथमिक आरोग्य केंद्र नरवेल, ता. मलकापूर जिल्हा - बुलढाणा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या नविन इमारतीचे बांधकाम करण्याकरीता कामाचा कार्यारंभ आदेश देण्याकरीता आदेशक अभियंता यांचे नावाने अप्रामाणिकपणे रु. १,५०,०००/- इतकी लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. १,००,०००/- इ. रक्कमेच्या लाचेच्या मोबदल्यात स्वतः स्विकारल्या म्हणून भ्र.प्र.अधि.-१९८८ (सुधारित अधि.२०१८) कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
प्रमोद रामसिंग परदेशी, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank................. No. .............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............................................ (3) Transferred to P.S ............................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name प्रमोद रामसिंग परदेशी
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court.

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**